# माळ्यांनो! माळी माळी करू नका, ओबीसी व्हा!

## (पुर्वार्ध व उत्तरार्ध एकत्रित वाचा)

**माळी राजकीय मिशन** या नावाने संघटन निर्माण झाले असून त्यांनी 2024 साली 4 खासदार व 40 आमदार माळी जातीतून निवडून आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलेले आहे. सर्वप्रथम एक खुलासा करतो की, माझा जात संघटनेला अजिबात विरोध नाही, कारण जात स्वतःच्या अंतर्गत नातेवाइकांची एक संघटनाच असते. त्यामुळे जोपर्यंत जातीव्यवस्था आहे, तो पर्यंत जात संघटना राहणारच! मात्र ही जात संघटना जेव्हा सार्वजनिक क्षेत्रांमध्ये काम करू ईच्छिते तेव्हा या जातसंघटनेचे स्वरूप कसे असले पाहिजे, ध्येय व उद्दिष्ट्य कोणते असले पाहिजे, त्यासाठी कोणती विचारधारा स्वीकारली पाहिजे, कृती-आराखडा व कृतीकार्यक्रम काय असला पाहिजे, याचा शास्त्रशूद्ध अभ्यास करून निर्णय घेतले पाहिजे. जातीच्या नावाने संघटन करण्यास व जातीचा एखादा कार्यक्रम घेण्यास फार काही कष्ट घ्यावे लागत नाहीत, कारण जातीचा प्रत्येक कार्यक्रम हा ''वधू-वर सूचक'' मेळाव्यापेक्षा जास्त गंभीरपणे कोणीच घेत नाही. **जातीचा बॅनर लावला की 100-150 लोक सहज जमतात, एकमेकांशी ओळख वाढवितात, जुन्या ओळखी अपडेट करतात, कुणाची मुलगी कुठे दिली, कुणाची नांदत नाही, कुणाचा घटस्फोट झाला, कोणाचा मुलगा लग्नाचा आहे अशी सर्व माहीती काढून आपलीहि मुलगी लग्नाची आहे, अशी वार्ता दोन-चार जणांच्या कानावर घालून, जेवण झाल्यावर लोक या कार्यक्रमातून पसार होतात व घरी जाऊन गोधळी ओढून घेतात.** जेवणानंतर 30-35 लोकही शिल्लक राहात नाहीत. मी गेल्या 40-42 वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. वेगवेगळ्या अनेक जातींच्या कार्यक्रमात मला मार्गदर्शक-वक्ता म्हणून निमंत्रित करीत असल्याने जातीचे कार्यक्रम कसे होतात, याचा मला चांगला अनुभव आहे.

जातीच्या अशा कार्यक्रमासाठी कोणताही शास्त्रशूद्धपणा लागत नाही. **मात्र एखाद्या जातीला संघटितपणे व्यापार, शिक्षण, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात जायचे असते, तेव्हा मात्र त्यांना शास्त्रशूद्ध अभ्यास करूनच काम करावे लागते.** आता हा मुद्दा तुमच्या अधिक लक्षात यावा म्हणून एक ऐतिहासिक उदाहरण देतो-

1917-18 साली स्वातंत्र्य चळवळीच्या दडपणाखाली इंग्रजांनी काही सुधारणा आणल्या. या सुधारणांप्रमाणे लोकांच्या हातात काहीप्रमाणात सत्ता द्यावी म्हणून विधानसभेची निर्मिती करण्याचे ठरले. या विधानसभेत लोकांमधून आमदार निवडून द्यायचे होते. त्याकाळी स्वातंत्र्य चळवळ करणाऱ्या कॉंग्रेस पक्षावर ब्राह्मण नेत्यांचे वर्चस्व होते व ते जनतेचे नेते म्हणून लोकप्रिय होते. बाळ गंगाधर टिळक हे या ब्राह्मणांचे नेते होते. त्यामुळे विधानसभेत मोठ्याप्रमाणात ब्राह्मण आमदारच निवडून येतील, यात काहीच शंका नव्हती. निवडणूका म्हणजे राजकारण व राजकारण म्हणजे सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठा हे समीकरण मराठा समाजाच्या लक्षात आले, आणी तेही या निवडणूकांसाठी सरसावलेत. त्यांनी लगेच जातीची संघटना "मराठा लीग" स्थापन केली. परंतू केवळ जातीची संघटना बांधून काहीही उपयोग नाही, कारण टिळकांच्या अफाट लोकप्रियतेसमोर मराठ्यांचा निभाव लागणार नाही, असे त्यांना काही मराठा विद्वानांनी लक्षात आणून दिले. **म्हणून मराठा समाजाने निवडून येण्यासाठी राजकीय आरक्षण मागितले. त्यानंतर दैनिक केसरीतून टिळक गरजले, "कुणबटांना असेंब्लीत येऊन काय नांगर हाकायचा आहे काय?" टिळकांच्या या डरकाळीने मराठे पुरते भांबावले.**

ब्राह्मणांनी ज्याप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीत शिरून आपले वर्चस्व निर्माण केले, त्याप्रमाणे आपल्यालाही कुठल्यातरी चळवळीत शिरुन राजकीय वर्चस्व निर्माण करावे लागेल, हे मराठा समाजाच्या लक्षात आल्यावर पर्याय शोधणे सुरू झाले. त्याकाळी तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांची सत्यशोधक चळवळ जनमाणसात लोकप्रिय होती. मराठ्यांनी सत्यशोधक चळवळीत शिरकाव करून आपले सामाजिक वजन वाढविले व सत्यशोधक चळवळीलाच ब्राह्मणेतर पक्ष बनवून आपले राजकीय वर्चस्वही निर्माण केले. ब्राह्मणेतर पक्षामुळे आपण केवळ आमदारच बनतो, सत्ता मात्र कॉंग्रेसी ब्राह्मणांच्याच ताब्यात राहते, हे लक्षात आल्यावर मराठा समाजाने सत्ता काबीज करण्यासाठी कॉंग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. **कॉंग्रेस ही गांधींमुळे सर्वधर्मीय व सर्वजातीय झाल्यामुळे देशातील एक फार मोठी मजबूत वोटबँक बनली होती. अशी मजबूत वोटबँक ताब्यात आल्यावर मराठे महाराष्ट्रात सत्ताधारी झालेत.** केवळ मराठा-मराठा करीत राहीले असते तर त्यांचे 1-2 आमदारही निवडून जाणे शक्य नव्हते.

माळी समाज माळी-माळी करीत राहीला तर माळ्यांचा एकही खासदार निवडून येणार नाही. जातीव्यवस्थेत एका जातीचं अनुकरण दुसऱ्या जाती लगेच करतात. माळ्यांनी माळी-माळी केलं की, धोबी जातसुद्धा धोबी-धोबी करेल, तेली जातही तेली-तेली करेल, मग तुमच्या माळ्याला मतदान कोण करेल? आणी तुमचा माळी खासदार कसा बनेल? **माळी राजकिय मिशनचे ध्येय व उद्दिष्ट एकच आहे, माळी माणूस निवडून आला पाहिजे, मग तो कोणत्याही पक्षाचा असो! हे ध्येय तर फारच घातक आहे. हे म्हणजे स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे.** कारण आता ज्या प्रस्थापित पक्षांकडून मोठ्याप्रमाणात आमदार-खासदार निवडून येतात, ते सर्व पक्ष मराठा व ब्राह्मण जातीच्या मालकिचे आहेत. तुम्ही कॉंग्रेस किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तिकीटावर उभे असलेले माळी निवडुन दिलेत तर ते मराठा समाजाचेच राजकारण मजबूत करणार! राष्ट्रवादी कॉंग्रेसचे खासदार अमोल कोल्हे हे माळी आहेत. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी या माळी खासदाराने केली, कारण तो पक्ष मराठ्यांचा आहे, त्या पक्षाचे सर्व खासदार-आमदार मराठा समाजाच्या हितासाठीच काम करणार, ओबीसी किंवा माळी खड्ड्यात गेला तरी चालेल, पण मराठ्यांचे भले झाले पाहिजे, असाच विचार कोल्हेंसारखे माळी खासदार करणार! कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कीतीही माळी तुम्ही निवडून दिलेत तरी अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवारच बनणार! अजित पवार अर्थमंत्री बनल्यानंतर ओबीसींचा इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी निधी देत नाही, त्यामुळे ओबीसींचे राजकीय आरक्षण खतम झाले, अजित पवारांनी ओबीसी-भटक्यांचं प्रमोशनमधील आरक्षण काढून घेतले, ओबीसींच्या महाजोतीचे 125 कोटी रूपये अजित पवारांनी काढून घेतले व ते मराठ्यांच्या सारथीला दिले. **एवढे मोठ-मोठे अन्याय झाल्यावरही माळी-ओबीसी जातीचा एकही आमदार-खासदार अजित पवारांच्या विरोधात बोलू शकला नाही, माळी-ओबीसी जातींना खड्ड्यात घालणारे असे नेभळट-नामर्द माळी आमदार तुम्ही निवडून देणार आहात काय?**

भाजपाच्या तिकीटावर उभे असलेले माळी खासदार-आमदार तुम्ही निवडून दिले तर माळी-ओबीसी अजून जास्त खड्ड्यात जातील. भाजपमध्ये कितीही माळी आमदार निवडून आलेत तरी मुख्यमंत्री एकतर ब्राह्मण बनेल किंवा मराठाच बनेल. याच

फडणवीसांनी 2016 ते 2019 दरम्यान सत्तेत असतांना ओबीसींचा इम्पिरीकल डेटा गोळा करायला टाळाटाळ केली, म्हणूनच ओबीसींचे राजकीय आरक्षण गेलं! भाजपा, कॉंग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, मनसे यासारख्या पक्षातून कितीही माळी आमदार निवडून दिलेत तरी माळी समाज खड्ड्यात जाणारच!

**सत्ता मिळविण्यासाठी मराठा समाज आधी 'सत्यशोधक' बनला व नंतर कॉंग्रेसमध्ये जाऊन 'बहुजन' बनला. बहुजन समाजातील सर्व जातींनी मराठ्यांना मोठाभाऊ मानलं, त्यामुळेच मराठा महाराष्ट्रात किमान 50 वर्षे सत्तेत राहीलेत.** आज ओबीसी चळवळीच्यानिमत्ताने माळी जातीला फार मोठी संधी चालून आलेली आहे. समस्त ओबीसी जाती माळी समाजाला मोठा भाऊ मानतात. अशा परिस्थितीत माळ्यांनी या ओबीसी चळवळीचे नेतृत्व केले पाहिजे. ओबीसी संघटनेत काम केले पाहिजे. या संघटनेला फुले शाहू आंबेडकरी विचारांचा भक्कम पाया असला पाहिजे. अशी संघटना घेऊन राजकारणात उतरलेत तरच ओबीसींचे आमदार, खासदार मोठ्या संख्येने निवडून येतील व ते माळीसमाजासकट इतर ओबीसी जातींचेही भले करतील. त्यासाठी 52 टक्के ओबीसींचा स्वतंत्र पक्ष निर्माण करा. **दोन टक्के लोकसंख्या असलेल्या बौद्धांचे राजकीय पक्ष आहेत, साडेतीन टक्के लोकसंख्या असलेल्या ब्राह्मणांचे राजकीय पक्ष आहेत, 5-6 टक्के लोकसंख्या असलेल्या मराठ्यांचे पक्ष आहेत, मग 8-10 टक्के माळी व 52 टक्के ओबीसींचा पक्ष का असू शकत नाही?**

आम्ही **"ओबीसी राजकीय आघाडी"** या नावाने पक्ष स्थापन करीत आहोत. माळी-ओबीसी समाजातील प्रामाणिक कार्यकर्त्यांनी या पक्षात सामील होऊन काम केले तर आपण निश्चितच सत्ताधारी होऊ, यात शंका नाही. आता हे काम कसे करायचे याची रूपरेषा सविस्तरपणे आपण उद्याच्या उत्तरार्धात पाहू या! तोपर्यंत जयजोती, जयभीम व सत्य कि जय हो!

## (उत्तरार्ध)

**माळी राजकीय मिशन** या नावाने संघटनेचा एक व्हाट्सप गृप आहे. या गृपवरील अनेक कमेंट्समध्ये एक कॉमन मुद्दा तुम्हाला वारंवार वाचायला मिळेल! तो मुद्दा असा

आहे की- **'माळी समाज महाराष्ट्रात संख्येने दोन नंबर आहे, आणी तरीही माळी समाजाला राजकारणात, सत्तेत स्थान नाही, संख्येच्या प्रमाणात आमदार नाहीत व मंत्रीही नाहीत.'** या मुद्द्यावर यापूर्वीही मी अनेकवेळा लिहीले आहे व बोललो आहे. लोकशाहीत संख्येवर सत्ता मिळत असते काय? ''जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागीदारी'' असे कांशीरामसाहेब म्हणाले होते. पण ते खरे आहे काय? लोकशाहीत फक्त डोकी मोजली जातात, हे खरे असले तरी या डोक्यांच्या आत कोणते विचार भरले आहेत, हेच जास्त महत्वाचे असते. **तसे नसते तर साडेतीन टक्के लोकसंख्या असलेल्या ब्राह्मणांचा भाजपा पक्ष 300 खासदार घेऊन दिल्लीत सत्तेत बसला नसता व 85 टक्के लोकसंख्या असलेला बहुजनांचा 'बहुजन समाज पक्ष' फक्त 10 खासदारांवर राहीला नसता.** 52 टक्के ओबीसींचे अनेक पक्ष देशात आहेत. लालू, मुलायम यांचे पक्ष तर शूद्ध ओबीसींचे पक्ष म्हटले जातात, मात्र या पक्षांची सत्ता दिल्लीत काय राज्यातही आता येत नाही.

**सत्ता ही कोणत्याही एका जातीमुळे अथवा एका धर्मामुळे मिळत नाही, तर विचार-तत्त्वज्ञानाच्या आधारे मिळत असते.** बाळ गंगाधर टिळक हे अनेक ब्राह्मण कार्यकर्त्यांना सोबत घेउन कॉग्रेसमध्ये गेलेत. कॉग्रेसला त्यांनी वेदांती ब्राह्मणी-हिंदू तत्वज्ञानाचा पाया दिला. शेंडी-जाणव्याचे ब्राह्मणी हिंदू तत्त्वज्ञान घेऊन त्यांनी कॉग्रेसची स्वातंत्र्य चळवळ चालविली. या तत्त्वज्ञानाचा त्यांनी भरपूर प्रचार-प्रसार केला, त्यासाठी त्यांनी 'गितारहस्य' नावाचा ग्रंथ लिहीला. शेंडी जाणव्याच्या हिंदूत्वाला विरोध करणाऱ्या सुधारकांना त्यांनी झोडपून काढले. सुधारक रानडेंच्या सामाजिक परीषदेचा मंडप रॉकेल टाकून जाळून टाकला. तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुलेंच्या सत्यशोधक चळवळीला कडाडून विरोध केला. शेंडी-जाणव्याचे ब्राह्मणी हिंदूत्व गल्ली-बोळातील लोकांच्या डोक्यात शिरले पाहिजे म्हणून गणेशोत्सव सुरू केला. टिळक व त्यांच्या शिष्यांनी प्रचंड मेहनत घेऊन हे ब्राह्मणी-हिंदूत्वाचे विचार जनतेच्या मनात बिंबवले. टिळकांच्या नंतर गांधीजी आलेत. त्यांनाही कॉग्रेसचा नेता बनण्यासाठी शेंडी-जाणव्याचे हिंदुत्व स्वीकारावे लागले. सत्यशोधक बनलेले मराठा नेते जेव्हा कॉग्रेसमध्ये गेलेत, तेव्हा या मराठ्यांनाही शेंडी-जाणव्याचे ब्राह्मणी हिंदूत्व स्वीकारावे लागले. **कॉग्रेसच्या ब्राह्मणी लाटेत फुले शाहू आंबेडकरी चळवळ कुठल्याकुठे वाहून गेली.** या देशावर किमान 50 वर्षे कॉग्रेसी

ब्राह्मणांची एकहाती सत्ता होती. या सत्तेच्या जोरावर ते बाबासाहेब आंबेडकरांचा निवडणूकीत पराभव करू शकलेत, 52 टक्के ओबीसींचा कालेलकर आयोग, मंडल आयोग दडपून टाकू शकलेत, ओबीसींची जनगणना बंद पाडू शकलेत, दलितांवर अनन्वीत अत्याचार बिनधास्तपणे करू शकलेत. हिंदू-मुस्लीम दंगली पेटवून मुस्लीमांचे शिरकाण करू शकलेत. इतकी मोठी प्रचंड ताकद या तत्त्वज्ञान-विचारसरणीमध्ये असते.

**पण आपल्या माळी-ओबीसींना हे विचारसरणी-तत्त्वज्ञान वगैरे काही माहीत नसते. बस्स! जातीची डोकी मोजायची आणी त्याच्या आधारे सत्तेची व आरक्षणाची भीख मागायची!** या देशावर 75 टक्के दलित-आदिवासी-ओबीसींची सत्ता यावी म्हणून फुलेशाहूआंबेडकरांनी विचार दिलेत. तत्त्वज्ञान दिले व चळवळही उभी केली. पण विचार-तत्त्वज्ञान सोडून आपण फक्त जातीची डोकी मोजत बसलोत. आपण ज्या महापुरूषांना आदर्श मानतो, त्या फुले-आंबेडकरांनी कधी जातींची डोकी मोजली का? त्यांनी कधी जातीची संघटना काढली का? तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांनी माळी समाज संघटना काढण्याएवजी सत्यसोधक समाज संघटना निर्माण केली. या सत्यशोधक समाजात ब्राह्मणांपासून तेली, माळी, मांग महार व मुसलमानसुद्धा सभासद होते. तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांचे शिष्य असलेल्या भालेरावांनी जातीची संघटना बांधण्याऐवजी शेतकरी संघटना बांधली, रावबहादद्दूर नारायण मेधाजी लोखंडे यांनी देशातील पहिली कामगार संघटना बांधली. तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांचे शिष्य असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महार जातीची संघटना बांधण्याऐवजी शेड्युल कास्ट फेडरेशन ही अस्पृश्य कॅटेगिरीची संघटना बांधली व स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. या सर्व संघटनांचा उपयोग त्यांनी जनतेच्या वैचारिक प्रबोधनासाठी केला. त्यांच्या या वैचारिक प्रबोधनातून त्याकाळी एक वोटबँक तयार झाली. या वोटबँकेमुळे स्वतंत्र मजूर पक्षातर्फे पहिल्याच निवडणूकीत 15 पैकी 13 आमदार निवडून आलेत. त्यात ब्राह्मण व ओबीसी जातीतूनही आमदार निवडून आले होते.

महापुरूषांचा एवढा गौरवशाली यशस्वी इतिहास असतांना आपण पुन्हा पुन्हा जातीचीच माती का खातो. जातीचाच माणूस निवडून आला पाहिजे, असा आग्रह का

धरतो? आपल्या जातीचाच माणूस आपल्या जातीचं भलं करू शकतो, या अंधश्रद्धेतून बाहेर पडा, तरच तुमच्या जातीचं भलं होईल. जातीची माणसं कुऱ्हाडीचा दांडा ठरतात व आपल्याच जातीचे हातपाय तोडतात. **जातीने मोठी केलेली माणसे स्वतःच्या स्वार्थासाठी जातीलाच खड्ड्यात घालायला मागे-पुढे पाहात नाहीत, हे अमोल कोल्हे या खासदाराने सिद्ध केले आहे.** जातीच्या बाहेर पडले तरच जातीचे भले होत असते, याची बरीच ऐतिहासिक उदाहरणे तुमच्यासमोर आहेत. त्यापैकी 2-3 उदाहरणे तुम्हाला देतो-

बिहारमध्ये 1970 च्या काळात समाजवादी तत्वज्ञान स्वीकारून तेथील ओबीसी जनतेने चळवळ उभी केली. त्यातून एक मोठी वोटबँक तयार झाली. या वोटबँकेत यादव जातींची संख्या मोठी होती. **जर यादव जातीने ठरविले असते तर त्याकाळात यादव जातीचाच मुख्यमंत्री झाला असता, परंतू यादव जातीने आपले मन मोठे केले आणी नाभिक जातीचे कर्पुरी ठाकूर यांना मुख्यमंत्री बनविले. या कर्पूरी ठाकूरांनी मुख्यमंत्री होताच ओबीसी आरक्षण लागू केले, ज्यात सर्वात जास्त फायदा यादवांचाच झाला.** मात्र कर्पुरी ठाकूर मुख्यमंत्री झाल्यामुळे नाभिक, सुतार, लोहार, कुंभार यासारख्या सर्व छोट्या-छोट्या बारा बलुतेदार जाती ओबीसी चळवळीत आल्या व ओबीसींची वोटबँक मजबूत झाली. कर्पूरी ठाकूर दोनवेळा मुख्यमंत्री झालेत. परंतू नंतरच्या काळात यादवांनी यादव जातीचेच राजकारण सुरू केले व तेही आपल्या माळ्यांप्रमाणे ‘यादव यादव’ करू लागलेत. यादव जातीचाच मुख्यमंत्री बनवायला सुरूवात केली. त्यामुळे बाकीच्या छोट्या-छोट्या ओबीसी जाती नाराज झाल्यात, त्याचा फायदा भाजपाने घेतला. यादवांचे राज्य गेले. आता तेथे भाजपाचे राज्य आहे. उत्तरप्रदेशचेही हेच रडगाणे आहे.

त्यानंतर दुसरे उदाहरण तामिळनाडूचे आहे. 1925 साली ब्राह्मणी कॉंग्रेसला लाथ मारून स्वामी पेरीयार यांनी सर्व ब्राह्मणेतर जातींना संघटित केले. तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांचे अब्राह्मणी तत्वज्ञान स्वीकारून रामायण-महाभारताविरोधात प्रबोधन सुरू केले. या चळवळीतून पुढे ओबीसींच्या नेतृत्वाखाली डीएमके पक्ष निर्माण झाला. **आज या पक्षातर्फे तेथे जो मुख्यमंत्री आहे तो गुरव जातीचा आहे. गुरव जात अल्पसंख्य आहे, मात्र तेथील बहुसंख्य ओबीसी जाती जातीयवादी राजकारण करीत नाहीत. जातीच्या**

**बाहेर पडून इतर छोट्या जातींना मोठ्या पदावर निवडून देतात.** त्याचा परिणाम असा झाला की तेथे ओबीसी वोटबँक मजबूत झाली आहे. तामीळनाडूमध्ये 50 टक्के ओबीसींना 50 टक्के आरक्षण आहे. त्या राज्यात लोकसभेपासून ग्रामपंचायत पर्यंतच्या सर्व निवडणूकांमध्ये 72 टक्के ओबीसीच निवडून येतात. त्यामुळे तेथे ओबीसींना निवडून येण्यासाठी कोणत्याही राजकीय आरक्षणाची गरज भासत नाही.

तिसरे उदाहरण फार महत्वाचे आहे- **भाजपा हा ब्राह्मणांचा पक्ष आहे. त्यांनी ठरविले तर ब्राह्मण प्रधानमंत्री ते करू शकतात. मात्र त्यांनी जातीचा विचार न करता ओबीसी मोदींना प्रधानमंत्री पदाचा उमेदवार बनविले. त्यामुळे त्यांची वोटबँक इतकी मजबूत झाली की, भाजपाचे 300 खासदार निवडून आलेत.** फडणवीसांना मुख्यमंत्री करण्याऐवजी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करण्यामागे त्यांचा हाच उद्देश आहे.

1917 साली मराठा जातीने जातीची संघटना 'मराठा लीग' स्थापन करून निवडणूका लढविण्याचे ठरविले. परंतू त्याकाळच्या काही मराठा विद्वानांनी सांगीतले की, जातीच्या राजकारणातून तुम्ही निवडून येऊ शकत नाहीत. त्याकाळचे मराठा लोक विद्वानांचे विचार मान्य करीत होते. म्हणून मराठ्यांनी जातीच्या बाहेर पडून सत्यशोधक व बहुजन बनून व्यापक राजकारण केले व सत्ताधारी झालेत. **आत्ताचे मराठे विद्वानांचं ऐकत नाहीत, जातीचेच राजकारण करतात, म्हणून आज त्यांच्यावर फडणवीस पेशव्याच्या नियंत्रणाखाली काम करावे लागते आहे. जी जात आपल्याच जातीतील विद्वानांचं ऐकत नाही, ती जात खड्ड्यात गेल्याशिवाय राहात नाही,** असा इतिहास आहे.

आज माळी समाज तात्यासाहेब महात्मा फुलेंचे विचार मानीत नाही, तात्यासाहेबांचा फक्त फोटो लावतात. त्यामुळे कमी शिकलेले, अभ्यास नसलेले लोक निवडून येतात व तेच विद्वान बनून मार्गदर्शन करतात, खरे विद्वान लोक मात्र अडगळीत पडून राहतात. आज सर्वच ओबीसी जाती अधिकाधिक खड्ड्यात जात आहेत, या खड्ड्यातून बाहेर पडण्यासाठी तुम्हाला फुलेआंबेडकरी विद्वानच उपयोगी पडतील. कमी शिकलेले, अभ्यास नसलेले व मराठा-ब्राह्मणांच्या पक्षांची गुलामगिरी करणारे आमदार-खासदार तुम्हाला अजून जास्त खड्ड्यात घालतील व वरून जातीची मातीही

लोटतील. बाबासाहेब आंबेडकर जातीव्यवस्थेला गटार म्हणत होते. तेव्हा **जातीच्या गटारीत डुकरासारखे लोळत पडू नका, माळी माळी करू नका, जातीच्या बाहेर पडा व ओबीसी बना! उद्याचे सत्ताधारी तुम्हीच व्हाल!**

**लेखक- प्रा. श्रावण देवरे**

**संपर्क मोबाईल- 88 301 27 270**

**ईमेल- s.deore2012@gmail.com**